
# कृषी कन्व्हेंशन सेंटर नागपुरात

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची घोषणा

नागपूर. देशातील शेतकऱ्यांना वर्षभर स्थायी स्वरूपात शेतीचे नवे तंत्रज्ञान, वेगळे प्रयोग यांची माहिती उपलब्ध करता येण्यासाठी देशातील पहिले कृषी कन्व्हेंशन सेंटर नागपूर येथे उभारले जाणार असल्याची माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पत्रपरिषदेत दिली.

मुख्यतः अमरावती मार्गावर या कृषी कन्व्हेंशन सेंटरची उभारणी करण्यात येणार आहे. या सेंटरची योजना




### देशातील एकमेव प्रोजेक्ट

तयार होत आहे. खासगी आणि सरकारी भागीदारीतून सुमारे 44 एकर जागेत हे सेंटर उभारले जाणार आहे. या सेंटरमधून वर्षभर शेतकऱ्यांना मार्गदर्शन होणार आहे. शेतीतील नवे तंत्रज्ञान, नवे प्रयोग प्रत्यक्ष शेतकऱ्यांना सेंटरच्या परिसरात शेतीच्या माध्यमातून दाखविण्याची व्यवस्था येथे राहणार आहे.

प्रदर्शनासोबतच कापूस उत्पादन, जैविक शेती, रेशीम उत्पादन, सूक्ष्म सिंचन, निसर्ग शेती हरितगृह, फुल शेती, संत्रा प्रक्रिया, मत्स्यपालन, दुग्ध विकास यासह 24 विषयांवर शेतकऱ्यांसाठी कार्यशाळा आणि एकदिवसीय परिषदा आयोजित होणार आहे.

## ॲग्रोव्हिजनच्या उद्‌घाटनाला येणार पंतप्रधान

### 23 ते 26 नोव्हेंबर दरम्यान कृषी प्रदर्शन



मध्य भारतातील सर्वात मोठे कृषी प्रदर्शन ॲग्रोव्हिजनच्या उद्‌घाटनासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निमंत्रित करण्यात आल्याची माहिती केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक व जहाजबांधणी मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. विदर्भातील कृषी परिवर्तनाचे महत्त्वाचे माध्यम व शेतकऱ्यांच्या प्रगतीचा महामार्ग ठरत असलेले हे कृषी प्रदर्शन 23 ते 26 नोव्हेंबरदरम्यान नागपुरातील रेशीमबाग मैदानावर आयोजित करण्यात आले आहे. ॲग्रोव्हिजन कृषी प्रदर्शनीत उपस्थित राहणाऱ्या दीड लाख शेतकऱ्यांना पंतप्रधान येथे मार्गदर्शन करतील.

उर्वरित पान 6 व